# करिअर कट्टा CSR

## अंतर्गत

मधुर समन्वय

Food On Wheel

करिअर कट्टाच्या वतीने ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीच्या सहकार्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कृषी उद्योजकीय कौशल्य वाढीस लागावे विशेषतः कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान त्यांनी आत्मसात करावे व त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचून त्यांच्या उत्पन्न वाढीसाठी मदत व्हावी. या उद्देशाने कृषी क्षेत्रामध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध रोजगाराच्या संधींची माहिती देण्याबरोबरच आर्टिफिशियल इंटेलिजन्स वर आधारित उत्पन्न वाढीची प्रक्रिया ॲग्रिकल्चर ड्रोन फ्लाईंग (Agriculture Drone Repair, Maintenance And Operating Skill Development) चे पूर्ण प्रशिक्षण आणि अधिकृत परवाना आणि मिलेट्स प्रोसेसिंग (Millets Processing) युनिट बद्दलची संपूर्ण माहिती व स्थापनेसाठीची आवश्यक असणारी संपूर्ण प्रक्रिया तसेच Agriculture E - Commerce याबाबतचे परिपूर्ण निवासी प्रशिक्षण देण्यासाठी हा उपक्रम कृषी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम या नावाने केला जातो. या अंतर्गत प्रथम बॅच मध्ये १०० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून येणाऱ्या कालावधीमध्ये प्रत्येक तालुक्यातून पाच विद्यार्थी असे एकूण चौदाशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण या उपक्रमांतर्गत आयोजित केले जाणार आहे. सीएसआर (CSR) अंतर्गत सुरू असणाऱ्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर व्हावे व स्वतःच्या उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून इतरांना नोकरी उपलब्ध करून द्यावी या उद्देशाने विद्यार्थ्यांना घडविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जातो. या सगळ्यात महत्वाची भूमिका असणारे, बारामती येथील ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे कृषी विज्ञान केंद्र आणि शैक्षणिक संकुलातील शारदाबाई पवार महिला आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, येथील अटल इन्क्यूबेशन सेंटर, सेंटर ऑफ एक्सलन्स, डेअरी आणि फूड प्रोसेसिंग ही सेवाकेंद्रे महाराष्ट्रातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांकरिता कृषीजन्य उद्योगाचे प्रशिक्षण घेण्याकरिता मौलिक ठरले आहेत. यामधून शेतीकडे पारंपारिक नजरेतून न बघता स्वतःला परंपरागत शेतकरी न समजता विद्यार्थ्यांनी स्वतःला कृषी उद्योजक म्हणून बघायला पाहिजे हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार आहे आणि हेच या कृषी उद्योजक कौशल्य विकास या उपक्रमाचे फलित असेल.

## फुड व्हॅन

करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम परिणामकारकपणे राबवण्यात यावेत या उद्देशाने विविध कंपन्यांच्या CSR निधीचा देखील उपयोग करून घेतला जातो याचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना व्यवसायाच्या दृष्टीने कौशल्याला चालना मिळावी या उद्देशाने सीएसआर अंतर्गत फुड व्हॅन उपलब्ध करून दिल्या जात आहेत त्याचप्रमाणे या उपक्रमांतर्गत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विक्री कौशल्य तसेच उत्पादनाचे कौशल्य देखील दिलं जातं त्याबरोबर या माध्यमातून व्यवसाय केल्यानंतर त्यांना त्यातला नफ्याचा भाग देखील दिला जातो त्यांच्या व्यवसाय कौशल्यात वृद्धी होऊन स्वतःच्या पायावर उभ राहण्यासाठीचा आत्मविश्वास देण्याचा काम करिअर कट्टाच्या या उपक्रमाद्वारे केले जाते.


## मधुर समन्वय

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत स्थानिक पातळीवरील रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या विचाराने मुंबईसह अनेक विद्यापीठांनी आपल्या वेगवेगळ्या व्हर्टिकलमध्ये मधुमक्षिका पालनाचा दोन क्रेडिटचा कोर्स तयार केलेला आहे. निश्चितच या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रातील अद्यावत ज्ञान मिळण्यासाठी फायदा होत आहे. पण या विषयांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाची जोड मिळाल्यास यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकते. हा विचार सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक डॉ. अजित दिघे यांनी करिअर कट्टाच्या राज्यस्तरीय समितीसमोर ठेवला आणि यातून 'मधुर समन्वय' या उपक्रमास मुर्त स्वरुप देण्यात येणार आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळ महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने राज्यातील १०० हून अधिक महाविद्यालयामध्ये प्रत्येकी ५० मधूमक्षिका पालनासाठीच्या पेट्या असणारे मधकेंद्र मधुर समन्वय अंतर्गत तयार केले जाणार आहे.

यामध्ये शासनाकडून दिली जाणार ५०% अनुदान, २५% महाविद्यालयाचा सहभाग आणि २५% सीएसआर या पद्धतीने या प्रशिक्षण केंद्राची निर्मिती केली जाणार आहे.

यासाठी सहा दिवसाचा 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मान्यता घेऊन केला जाणार आहे. या माध्यमातून ज्या ठिकाणी मधुमक्षिका पालन या व्यवसायासाठी पोषक वातावरण आहे अशा १०० हून अधिक तालुक्यांमधील महाविद्यालयांची निवड करून त्यांच्या प्राध्यापकांना फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम या अंतर्गत प्रशिक्षण देऊन, खादी ग्रामोद्योग मंडळाच्या स्थानिक पातळीवरील प्रशिक्षकांचा सहभाग मिळवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिवर्षी किमान ३०००० तरुणांना 'मधुर समन्वय' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्याचे नियोजित केलेले आहे. सदर उपक्रमांतर्गत महाविद्यालयाची निवड प्रक्रिया राज्यस्तरीय समिती यांच्याद्वारे केली जाईल.

## राज्यस्तरीय मधुर समन्वय गुणवत्ता नियंत्रण समिती



**मा. रविंद्र साठे**
सभापती, (राज्यमंत्री दर्जा)
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई



**मा. गीतांजली बाविस्कर (भा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई



**मा. रवींद्र ठाकरे**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई




**मा. नित्यानंद पाटील**
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई



**मा. यशवंत शितोळे**
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती
तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र



**प्राचार्य मा. डॉ. अतुल साळुंखे**
मुंबई विभागीय प्राचार्य प्रवर्तक,
करिअर कट्टा



**प्र. प्राचार्या मा. डॉ. दीपा वर्मा**
विभागीय समन्वयक,
करिअर कट्टा



**प्रा. मा. डॉ. अजित दिघे**
सिंधुदुर्ग जिल्हा समन्वयक,
करिअर कट्टा